लोकमत

# जगी ज्यास कोणी पुसत नाही.. त्यांच्या मदतीला आहे खाकी !

## लोहमार्ग पोलिसांची माणुसकी; बेवारस मृतदेहांवर करतात अंत्यसंस्कार

स्पेशल रिपोर्ट

आप्पासाहेब पाटील
लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : एकीकडे समाजातील, कुटुंबातील जिवंत माणसांमधील नातेसंबंधांची वीण सैल होत असताना मृत पावलेल्या लोकांकडे पाहण्यासाठीसुध्दा कुणाकडे फारसा वेळ नसतो. बेवारस असलेल्यांचे तर हालच आहेत. अशाही स्थितीत बेवारस मृतदेहांवर एखाद्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे माणुसकीच्या दृष्टिकोनातून अंत्यसंस्कार करण्याचे काम सामाजिक संस्था, संघटनांच्या मदतीने लोहमार्ग पोलिस करीत असल्याचे दिलासादायक चित्र नेहमीच दिसून येते.

मध्य रेल्वेच्या लोहमार्ग पोलिस दलाच्या पुणे विभागात सहा पोलिस ठाणे येतात. प्रवाशांसोबत इतर संदर्भाने कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी लोहमार्ग ठाण्यावर आहे. शेकडो एक्स्प्रेस, मेल, पॅसेंजर, लोकल धावतात. वाहतूक मोठी असल्याने रेल्वेच्या धडकेत किंवा रेल्वेसमोर उडी मारून आत्महत्या करणाऱ्या लोकांचा मृत्यूचा आलेख उंचावत जात आहे. त्यातील बहुतांश जणांची ओळख पटते; पण अनेक जण आपली ओळख न सांगताच जगाचा निरोप घेतात. त्यांची ओळख पटविण्यासाठी पोलिस शेवटपर्यंत प्रयत्न करतात हेही तितकेच खरे.

### अन् लोहमार्ग पोलिस जंग जंग पछाडतात

समाजात राहून अनेकजण विविध मार्गांनी जमेल त्या पध्दतीने माणुसकीच्या दृष्टिकोनातून समाजसेवा करताना आपण नेहमीच पाहतो. मात्र अहोरात्र लोकांच्या सुरक्षेची जबाबदारी पेलणाऱ्या पोलिस बांधवांच्या समाजसेवेचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. बेवारस मृतदेहांच्या नातेवाइकांचा शोध घेण्यासाठी, त्यांची ओळख पटविण्यासाठी लोहमार्ग पोलिस जंग जंग पछाडतात हेही तितकेच सत्य आहे.

### तोपर्यंत मृतदेह ठेवला जातो शवागारात...

- अपघातातील बेवारस मृतांना शोधण्यासाठी रेल्वे पोलिस सोशल, प्रिंट अन् ऑनलाइन मीडियाचा आधार घेत आहेत. ओळख पटविण्याची आशा नसल्यास तीन दिवसांनंतर बेवारसांवर पोलिस स्वत: अंत्यसंस्कार करतात. अन्यथा तपासात धागेदोरे सापडल्यास तो मृतदेह काही दिवस, तपास पूर्ण होईपर्यंत शवगृहात ठेवला जातो. याबाबत पोलिस डॉक्टरांना मृतदेह शवगृहात ठेवण्यासाठी विनंती करतात.

### तिकीट अन् मोबाइलवरून मिळू लागले नातेवाईक

- रेल्वेच्या अपघातात अनेकांना प्राण गमवावे लागतात. त्यात अपघातानंतर मृतांची ओळख पटविणे अथवा त्यांच्या नातेवाइकांना शोधण्यासाठी विविध उपाययोजना रेल्वे पोलिसांकडून राबविल्या जातात. दरम्यान, रेल्वे तिकीट किंवा त्या मृताजवळ असलेल्या मोबाइलवरून त्यांच्या नातेवाइकांचा शोध घेणे सोपे होत असल्याचे रेल्वे पोलिसांनी सांगितले.

### बेवारस मृतदेहांबाबतची आकडेवारी

| पोलिस ठाणे | बेवारस मृतांची संख्या |
|---|---|
| पुणे | ११२ |
| दौंड | २० |
| अहिल्यानगर | १६ |
| सोलापूर | २१ |
| कुर्डूवाडी | २६ |
| मिरज | २६ |





मृत व्यक्तींवर अंत्यसंस्कार करताना तो केवळ एक माणूस आहे हेच डोळ्यासमोर ठेवून लोहमार्ग पोलिस काम करीत असतात. कुठेही जात, धर्म पाहिला जात नाही. बेवारसांवरसुध्दा अंत्यसंस्कार झाले पाहिजे, या भावनेतून आम्ही लोहमार्ग पोलिस काम करीत आहोत. पुणे विभागात संस्था, संघटना, मनपाच्या मदतीने आजपर्यंत शेकडो बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याचे काम लोहमार्ग पोलिसांनी केले आहे.

- मनोज यादव, पोलिस उपअधीक्षक, लोहमार्ग पोलिस, पुणे